राज्यातील दुध उत्पादकांनादुध खरेदी दरात वाढ
दुध सहकारी संस्था/ संघ यांच्या कमिशन दरात वाढ.
व शासकीय दुधाच्या विक्री दरात वाढ

महाराष्ट्र शासन
कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग,
शासन निर्णय, कमांक- एमएलके- १०१०/ प्र.क्र.४४/१० /पदुम-८
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२.
दिनांक- २९मार्च, २०१०

वाचा:- १) शासन निर्णय, कृषि व पदुम विभाग, क्रमांक- एमएलके- १०९९/प्र.क्र. ३२१/पदुम-८, दि.२७/१२/२०००

२) शासन निर्णय, कृषि व पदुम विभाग, क्रमांक- एमएलके- १००५/१२८१/प्र.क्र. १५/पदुम-८, दि. १३ जून, २००६

३) शासन पूरक पत्र, कृषि व पदुम विभाग क्रमांक- एमएलके- १००५/१२८१/प्र.क्र. १५/पदुम-८, दि. ११/९/२००६.

४) शासन निर्णय , कृषि व पदुम विभाग, कमांक- एमएलके- १००५/१२८१/प्र.क्र. १५/पदुम-८ मंत्रालय, मुंबई-४०० ०३२. दिनांक- ७ नोव्हेंबर, २००७

५) शासन निर्णय कमांक- दुवियो-१००८/प्र.क्र. ३०७/पदुम-९, मंत्रालय, मुंबई-३२. दि. ३१.१.२००९

६) शासन निर्णय , कृषि व पदुम विभाग, शासन निर्णय क्रं.एमएलके१००९/१०३७५/प्र.क्र.७१/ पदुम-८, दि.१३.०८.२००९.

७)शासन निर्णय, कृषि व पदुम विभाग, कमांक- दुवियो-१००९/१८७१२/प्र.क्र.१४९/पदुम-८, मंत्रालय, मुंबई-३२. दि. ३१.१२.२००९.

**<u>प्रस्तावना-</u>**

राज्यातील दूध संकलन शासन, सहकार व खाजगी क्षेत्रामार्फत होत असल्याने दूध उत्पादनातील चढ उतार लक्षात घेऊन काही संघ व बहुतेक खाजगी प्रकल्प दूध खरेदी दरात बदल करुन त्यांच्याकडील दूध संकलन/वितरण नियंत्रीत करीत असल्याचे दिसून येते. दूध खरेदी दरातील बदलामुळे शासनाकडे होणा-या दूध पुरवठयावर परिणाम होऊन शासनाकडील दूध उत्पादन/वितरण यामध्ये नियोजन राखणे शक्य होत नाही.

चारा, पशुखाद्य, औषधे इत्यादिंच्या किंमतीत वाढ झाल्याने दूध उत्पादन खर्च दूध उत्पादकांना परवडत नसल्याने दुधाचे दर व दूध उत्पादनाचा खर्च यात मेळ बसविणे शेतक-यांना कठीण झालेले आहे. त्यामुळे शेतकरी जादा दराने खाजगी व्यापा-यांना दूध पुरवठा करीत असून शासनकडील दूध संकलन कमी होत आहे. त्यामुळे शेतकरी जादा दराने खाजगी व्यापाऱ्यांना दूध पुरवठा करीत असून शासनाकडील दूध संकलन कमी होत आहे. त्यामुळे दूध खरेदी दरात वाढ करणे संदर्भात कृषि व पदुम विभाग, शासन निर्णय क्रं.एमएलके१००९/१०३७५/प्र.क्र.७१/पदुम-८, दि.१३.०८.२००९. अन्वये गठीत करण्यात आलेल्या प्रदत्त समितीच्या दि.१६.०२.२०१० रोजी बैठकीत चर्चा होऊन काही शिफारशी करण्यात आल्या. त्यानंतर मा.मंत्री (पदुम) व वित्त विभाग यांच्या मान्यतेने आता खालील प्रमाणे आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.

**शासन निर्णय :-**

१) राज्यातील दुध उत्पादकांना देण्यात येणा-या गाय दुध खरेदी दरात प्रतिलिटर रू.१.५० वाढ करण्यात येत आहे. (३.५/८.५ या गुण प्रतिसाठी प्रति लि. रू.१२.५० ऐवजी रू.१४.०० प्रति लिटर)

२) राज्यातील दुध उत्पादकांना देण्यात येणा-या म्हैस दुध खरेदी दरात प्रतिलिटर रू.४.३० वाढ करण्यात येत आहे. (६.०/९.० या गुण प्रतिसाठी प्रति लि. रू.१६.२० ऐवजी रू.२०.५० प्रति लिटर)

## गाय/म्हैस दुध खरेदी तक्ता

**गाय दूध दर** | **म्हैस दूध दर**

| गुण प्रत फॅट % | एस.एन.एफ % | सुधारीत दर रू. प्रति लि. | गुण प्रत फॅट % | एस.एन.एफ % | सुधारीत दर रू. प्रति लि. |
|---|---|---|---|---|---|
| ३.५ | ८.५ | १४.०० | ६.० | ९.० | २०.५० |
| ३.६ | ८.५ | १४.१५ | ६.१ | ९.० | २०.८० |
| ३.७ | ८.५ | १४.३० | ६.२ | ९.० | २१.१० |
| ३.८ | ८.५ | १४.४५ | ६.३ | ९.० | २१.४० |
| ३.९ | ८.५ | १४.६० | ६.४ | ९.० | २१.७० |
| ४.० | ८.५ | १४.७५ | ६.५ | ९.० | २२.०० |
| ४.१ | ८.५ | १४.९० | ६.६ | ९.० | २२.३० |
| ४.२ | ८.५ | १५.०५ | ६.७ | ९.० | २२.७० |
| ४.३ | ८.५ | १५.२० | ६.८ | ९.० | २३.०० |
| ४.४ | ८.५ | १५.३५ | ६.९ | ९.० | २३.३० |
| ४.५ | ८.५ | १५.५० | ७.० | ९.० | २३.६० |

राज्यातील सहकारी संघ/ संस्था यांच्याकडून खरेदी करण्यात येणाऱ्या गाय/ म्हैस दुधाकरीता सध्याच्या कमिशन मध्ये प्रति लिटर ०.२५ पैसे वाढ करण्यात यावी. याची विगतवारी खालील प्रमाणे आहे.

| तपशिल | सध्याचे प्रति लिटर कमिशन | दि. ०१/०४/२०१० पासून कमिशन |
|---|---|---|
| वाहतूक खर्च | ०.७५ | ०.८० |
| कॅम्प खर्च | ०.०५ | ०.०५ |
| व्यवस्थापन खर्च | ०.५० | ०.६० |
| शितकरण खर्च | ०.२५ | ०.२५ |
| संस्था कमिशन | ०.६० | ०.७० |
| एकूण | २.१५ | २.४० |

३) राज्यातील शासकीय दुध योजना मार्फत विक्री होणाऱ्या गाई दुधाच्या विक्री दरात प्रति लि.रू.२.०० वाढ करण्यात येत आहे. (राज्यात विक्री दर रू.२२.०० प्रति लि. ऐवजी रू.२४.०० प्रति लि.व बृहन्मुंबईत प्रति लिटर रू.२३.०० वरून रू.२५.०० प्रति लिटर)

४) राज्यातील शासकीय दुध योजना मार्फत विक्री होणाऱ्या म्हैस दुधाच्या विक्री दरात प्रति लि.रू.५.०० वाढ करण्यात येत आहे. (सध्याच्या ग्रामीण दुध योजनांसाठीचा दर प्रतिलिटर रू.२५.०० ऐवजी रू.३०.०० प्रति लिटर बृहन्मुंबई दूध योजनेसाठी म्हैस दुधाचा विक्री दर प्रति लि.रू.२६.०० वरुन रू.३१.०० प्रति लिटर)

५) राज्यातील शासकीय दुध योजना मार्फत विक्री होणाऱ्या फुल क्रिम दुधासाठी विक्री दरात प्रति लि.रू.२.०० वाढ करण्यात येत आहे. (राज्यात विक्री दर रू.२८.०० प्रति लि. ऐवजी रू.३०.०० प्रति लि. व बृहन्मुंबईत विक्रीदर रू.२९.०० प्रति लिटर वरुन रू.३१.०० प्रति लिटर)

६) शासकीय दुध योजना मार्फत दूध वितरकांना सध्याच्या कमिशनमध्ये प्रतिलिटर ०.२५ पैसे याप्रमाणे वाढ करण्यात येत आहे. (सध्याच्या प्रतिलिटर रू.१.५० पैसे ऐवजी कमिशन रू.१.७५ प्रतिलि. सरसकट राहील.) (रू.१.२५ वितरक कमिशन व ०.५० पैसे वाहतुक खर्च)

७) राज्यातील शासकीय दुध योजना मार्फत होणाऱ्या कमी गुणप्रतीच्या दुध स्विकृतीसाठी ३.३ टक्के फॅटपर्यंत प्रति पॉईन्ट ५० पैसे कमी दराने स्विकृती केली जात आहे, त्यात बदल नाही.

सदर आदेश दि. १ एप्रिल, २०१० पासून अंमलात येतील.

हा शासन निर्णय वित्त विभागाच्या सहमतीने व त्या विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्रमांक- २५१/२०१०/व्यय-२, दिनांक २९/०३/२०१० अन्वये निर्गमीत करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

सही/-
(फि.जॉ.डिसोझा)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,
आयुक्त, दुग्धव्यवसाय विकास, महाराष्ट्र राज्य, वरळी, मुंबई.
सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य,पुणे.
आयुक्त, पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे.
सर्व विभागीय आयुक्त
सर्व जिल्हाधिकारी
व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी दुध महासंघ मर्या. गोरेगाव, मुंबई.
महाव्यवस्थापक, बृहन्मुंबई दूध योजना, वरळी, मुंबई-१८.
प्रादेशिक दुग्धव्यवसाय विकास अधिकारी, पुणे/नागपूर/मुंबई/औ.बाद/नाशिक/अमरावती
सर्व जिल्हा दुग्ध विकास अधिकारी.
सर्व महाव्यवस्थापक/व्यवस्थापक, शासकिय दुध योजना
मुख्य कार्यकारी अधिकारी, आरे दुग्ध वसाहत, गोरेगाव, मुंबई.
प्रकल्प अधिकारी, दुग्धप्रकल्प दापचरी, जि. ठाणे.
महालेखापाल-१/२, महाराष्ट्र (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परिक्षा), मुंबई/नागपूर
अधिदान व लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई.
निवासी लेखा अधिकारी, मुंबई.
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
वित्त विभाग (व्यय-२)
सर्व कार्यासने (पदुम विभाग)
निवडनस्ती.

DUDHDARWAD

राज्यातील दुध उत्पादकांनादुध खरेदी दरात वाढ
दुध सहकारी संस्था/ संघ यांच्या कमिशन दरात वाढ.
व शासकीय दुधाच्या विक्री दरात वाढ

महाराष्ट्र शासन
कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग,
शासन शुध्दीपत्रक, कमांक- एमएलके- २०१०/ प्र.क्र. १२१ /पदुम-८
मंत्रालय विस्तार, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक- ३१मार्च, २०१०

वाचा:- १) शासन निर्णय, एमएलके- १०१०/प्र.क्र.४४/१०/पदुम-८, दि. २९ मार्च /२०१०

**शासन शुध्दिपत्र**

राज्यातील दूध उत्पादकांना दुध खरेदी दरात वाढ, दूध सहकारी संस्था/ संघ यांच्या कमिशन दरात वाढ व शासकीय दुधाच्या विक्री दरात वाढ करण्या संबंधीच्या शासन निर्णय क्र.एमएलके-१०१०/प्र.क्र.४४/१०/पदुम-८ दि.२९ मार्च २०१० मध्ये खालील प्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे.

१) शासन निर्णयातील अनुक्रमांक २ मधील गाय/ म्हैस दुध खरेदी दरातील तक्त्यामध्ये ४.५ % गुणप्रत फॅट व ८.५ % एस.एन.एफ.असलेल्या गाय दुधाचे दर "रू.१५.१० ऐवजी रू.१५.५०" असे वाचण्यात यावे.
२) शासन निर्णयातील अनुक्रमांक २ मधील तक्ता क्र.२ वगळण्यात येत आहे. व त्याऐवजी खालील तक्ता अंर्तभूत करण्यात येत आहे.

| तपशिल | सध्याचे प्रति लिटर कमिशन | दि. ०१/०४/२०१० पासून कमिशन |
|---|---|---|
| वाहतूक खर्च | ०.९० | ०.९५ |
| कॅन खर्च | ०.०५ | ०.०५ |
| व्यवस्थापन खर्च | ०.३० | ०.४० |
| शितकरण खर्च | ०.२५ | ०.२५ |
| संस्था कमिशन | ०.६५ | ०.७५ |
| एकूण : | २.१५ | २.४० |

३) शासन निर्णयातील अनुक्रमांक ६ येथील "(रू.१.२५ वितरक कमिशन व ०.५० पैसे वाहतुक खर्च) या शब्दाऐवजी (रू.१.१५ वितरक कमिशन व ०.६० पैसे वाहतुक खर्च ) असे वाचावे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

सही/-
(फि.जों.डिसोझा)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,
आयुक्त, दुग्धव्यवसाय विकास, महाराष्ट्र राज्य, वरळी, मुंबई.
सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य,पुणे.
आयुक्त, पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे.
सर्व विभागीय आयुक्त
सर्व जिल्हाधिकारी
व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी दुध महासंघ मर्या. गोरेगाव, मुंबई.
महाव्यवस्थापक, बृहन्मुंबई दूध योजना, वरळी, मुंबई-१८.
प्रादेशिक दुग्धव्यवसाय विकास अधिकारी, पुणे/नागपूर/मुंबई/औ.बाद/नाशिक/अमरावती
सर्व जिल्हा दुग्ध विकास अधिकारी.
सर्व महाव्यवस्थापक/व्यवस्थापक, शासकिय दुध योजना
मुख्य कार्यकारी अधिकारी, आरे दुग्ध वसाहत, गोरेगाव, मुंबई.
प्रकल्प अधिकारी, दुग्धप्रकल्प दापचरी, जि. ठाणे.
महालेखापाल-१/२, महाराष्ट्र (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परिक्षा), मुंबई/नागपूर
अधिदान व लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई.
निवासी लेखा अधिकारी, मुंबई.
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
वित्त विभाग (व्यय-२)
सर्व कार्यासने (पदुम विभाग)
निवडनस्ती.

आयुक्त दुग्धव्यवसाय विकास यांचे कार्यालय,

DUDHDARWAD